दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 12 एप्रिल 2026 | अंक क्र. 323 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# वारकरी संप्रदायातील अर्बन नक्षलवाद्यां'वर शरद पवार गप्प का?

## नवनाथ बन यांचा सवाल; लव्ह जिहाद, लांगुलचालनावरून विरोधकांवर टीका

■ मुंबई वृत्तसंस्था

"वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारांची घुसखोरी झाल्याची चिंता व्यक्त करणाऱ्या शरद पवार यांनी, याच संप्रदायात शिरकाव केलेल्या 'अर्बन नक्षलवाद्यां'वरही कधीतरी बोलावे. या घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी पवारांकडे काय योजना आहे आणि त्यांची संख्या किती, हे त्यांनी एकदा महाराष्ट्रासमोर स्पष्ट करावे," असे आव्हान भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी दिले. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शरद पवार यांच्या विधानाचा समाचार घेताना बन म्हणाले की, "वारकरी संप्रदाय हा प्रबोधन करणारा आणि भागवत धर्माची पताका उंचावणारा संप्रदाय आहे. या संप्रदायात धर्मांध शक्ती नाहीत. खरं तर औरंगजेब आणि अफजल खानाची वंशावळ हीच खरी धर्मांध शक्ती आहे. महाराष्ट्रात सध्या लव्ह जिहाद, व्होट जिहाद आणि लँड जिहादचे संकट उभे ठाकले असताना ज्येष्ठ नेते असूनही पवार यावर का बोलत नाहीत?" काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांच्यावर टीका करताना बन म्हणाले, "राहुल गांधी हे औरंगजेब फॅन क्लबचे अध्यक्ष आहेत असे वाटत असल्यानेच वडेट्टीवार अफजल खानाच्या दाढ्या कुरवळण्याचे काम करत आहेत. खरात याने केलेल्या कृत्याबद्दल कारवाई करण्याची हिंमत काँग्रेस सरकारमध्ये झाली नसती. राज्यात महायुतीचे सरकार आणि देवेंद्र फडणवीस गृहमंत्री आहेत, म्हणूनच तत्काळ कारवाई झाली," असा दावा त्यांनी केला.



### मुंबई महापालिकेत 'एआय'चा पहारा

मुंबई महापालिकेच्या कारभारावर भाष्य करताना त्यांनी नालेसफाईतील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला. "महापालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आम्ही 'मुंबईकरांचे पहारेकरी' म्हणून काम करत आहोत. नालेसफाईतील घोटाळे रोखण्यासाठी आगामी काळात आवश्यक तिथे 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर महायुतीचा भर असेल," असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आष्टीत क्रांतीसूर्य म .फुले जयंती उत्साहात साजरी; सर्वपक्षीय मान्यवरांकडून विनम्र अभिवादन

## महात्मा फुले चौकात महामानवाच्या विचारांचा जागर; पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण

■ आष्टी (प्रतिनिधी)

स्त्री शिक्षणाचे प्रणेते, दिनदुबळ्यांचे कैवारी आणि बहुजनांचे उद्धारकर्ते क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांची जयंती आष्टी शहरात मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली.शहराचे मुख्य आकर्षण असलेल्या 'क्रांतीसूर्य म.फुले चौकामध्ये' सर्वपक्षीय राजकीय नेते,आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत या महामानवाला अभिवादन केले.शहरातील महात्मा फुले चौकात उभारण्यात आलेल्या महात्मा फुले यांच्या भव्य आणि विलोभनीय अशा पूर्णाकृती पुतळ्याला आज सकाळपासूनच नागरिकांनी अभिवादनासाठी गर्दी केली होती.यावेळी आयोजित करण्यात आलेल्या मुख्य अभिवादन सोहळ्यात परिसरातील अनेक दिग्गज मान्यवरांनी हजेरी लावली.

या सोहळ्याप्रसंगी विद्यमान आ.सुरेश धस,माजी आ. भीमराव धोंडे यांनी महामानवाच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या चरणी नतमस्तक होत विनम्र अभिवादन केले.यासोबतच शहराचे प्रथम नागरिक तथा नगराध्यक्ष जिया बेग यांनीही पुष्पहार अर्पण करून फुले यांच्या महान कार्याचे स्मरण केले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आणि अभिवादन करण्यासाठी

वाल्मिक निकाळजे,सतीश शिंदे,विठ्ठलअण्णा बनसोडे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, रत्नदीप निकाळजे,सरपंच अशोक मुळे,माजी सरपंच रामसेठ मधुरकर,अरुणभैय्या निकाळजे, यशवंत खंडागळे, सुधीर पठाडे,जयदीप गायकवाड,प्राचार्य डॉ.सोपान निंबोरे,माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे,सुरेश वारंगुळे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, अजित मुळे,सतीश गायकवाड सुरज शिंदे,आदेश निमोणकर, विजय धनवडे,नगरसेवक, व्यापारी,सामाजिक कार्यकर्ते आदी आजी-माजी पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुतळ्याला पुष्पहार घालून महात्मा फुले यांच्या समाजसुधारणेच्या कार्याला उजाळा दिला.

### समतेच्या विचारांचा जागर

■ यावेळी बोलताना अनेक मान्यवरांनी महात्मा फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक समतेसाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व विषद केले. आजच्या आधुनिक काळातही जोतीरावांचे विचार समाजाला दिशादर्शक कसे ठरत आहेत, यावर उपस्थितांनी प्रकाश टाकला. 'महात्मा फुले यांचा विजय असो', 'क्रांतीसूर्य जोतीराव फुले अमर रहे' अशा गगनभेदी घोषणांनी आष्टीतील म.फुले चौक दुमदुमून गेला होता.या अभिवादन सोहळ्याला परिसरातील नागरिक,तरुण वर्ग आणि विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय शांततेत,उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने हा जयंती महोत्सव संपन्न झाला.यावेळी माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की, पुढल्या वर्षी महात्मा फुले यांची २०० वी.जयंती साजरी होणार आहे. त्यानिमित्त या चौकामध्ये महात्मा फुले यांचा पुतळा बसवण्याचा कार्यकर्त्यांचा मानस आहे. हा मानस पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल असे माध्यमांशी बोलताना सांगितले.






# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे भव्य मंदिर उभारणीसाठी देणग्यांचा ओघ सुरूच; नाथभक्तांना सहकार्याचे आवाहन

■ आष्टी (प्रतिनिधी)

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने मच्छिंद्रनाथ येथे सुरू असलेल्या भव्य व दिव्य मंदिर उभारणीच्या कामांना सध्या चांगलाच वेग आला असून परिसरातील विविध विकासकामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात आहेत. या पवित्र कार्यासाठी राज्यभरातील भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून सढळ हस्ते देणग्यांचा ओघ सुरू आहे.

शनिवारी गडाचे विश्वस्त आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत विविध नाथभक्तांकडून देणग्या स्विकारण्यात आल्या. यावेळी हुले कन्स्ट्रक्शनचे विश्वनाथ हुले यांनी १ लाख ७ हजार रुपये, कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथील नाथभक्त राजेंद्र चौगुले यांनी २१ हजार रुपये, तसेच आष्टी येथील महेश चौरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त ११ हजार रुपये देणगी स्वरूपात अर्पण केले.

मंदिर उभारणी व परिसर विकासाची ही सेवा अत्यंत पवित्र आणि समाजोपयोगी असल्याचे नमूद करत, सर्व नाथभक्तांनी या कार्यात सहभागी होऊन आपल्या परीने सढळ हस्ते देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

कोल्हापूर येथील सोने-चांदीचे व्यापारी व नाथभक्त राजेंद्र चौगुले यांनी एक आदर्श घालून दिला आहे. सन १९९९ मध्ये आ. सुरेश धस हे आमदार व्हावेत यासाठी व्यापाऱ्यांमध्ये लावलेल्या पैजेतील जिंकलेली ८ हजार रुपयांची रक्कम त्यांनी जपून ठेवली होती. आता मुलाच्या लग्नाचे औचित्य साधून अनावश्यक खर्च टाळत त्या रकमेत वाढ करून एकूण २१ हजार रुपये श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानाच्या मंदिर जिर्णोद्धारासाठी देणगी म्हणून अर्पण केली.

# छगन भुजबळ हेलिकॉप्टर अपघात प्रकरणाची चौकशी होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई वृत्तसंस्था

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ (Chhagan Bhujbal) यांच्या हेलिकॉप्टरच्या अपघाती लँडिंगबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुरंदरमध्ये मंत्री छगन भुजबळ सुरक्षित आहेत, पण पायलटचा निष्काळजीपणा उघड झाला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (CM Devendra Fadnavis) यांनी स्पष्ट केले की, या संपूर्ण घटनेची चौकशी नक्की केली जाईल.

### नेमकी घटना काय ?

■ राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ (Chhagan Bhujbal) यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंगबाबत पुरंदरमध्ये एक धक्कादायक आणि तितकाच थरारक प्रकार समोर आला आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त खानवडी येथे आयोजित कार्यक्रमाला जात असताना, पायलटने हेलिकॉप्टर हेलिपॅडवर न उतरवता चक्क वाहनांच्या पार्किंगमध्ये उतरवले. या प्रकारामुळे उपस्थित पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी धावपळ उडाली असून, सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, क्रांतीज्योती महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी छगन भुजबळ हेलिकॉप्टरने येणार होते. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून खानवडी गावात त्यांच्या लँडिंगसाठी सर्व निकष पाळून सुरक्षित ठिकाणी हेलिपॅड तयार केले होते.

# संपादकीय

## पुन्हा चंद्रमाच्या दिशेने

**५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे. फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लाय-बाय' मोहीम आहे.**

**याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.**

**अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल.**

**अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.**

**अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे.**

**भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.**



# सामाजिक समता सप्ताहांतर्गत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्साहात साजरी

■ नांदेड प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह-२०२६ अंतर्गत आज ११ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता नांदेड येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले व सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी समाज कल्याण विभागातील अधिकारी, कर्मचारी, तालुका समन्वयक व समतादूत मोठ्या संख्येने उपस्थित होते.




जयंतीनिमित्त उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना शुभेच्छा देत जिल्हाधिकारी राहूल कर्डीले व सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या महान कार्याची माहिती दिली.

त्यानंतर समाज कल्याण कार्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भिमराव हाटकर (सामाजिक कार्यकर्ते), राज गोडबोले (सामाजिक कार्यकर्ते), संभाजी कांबळे (दै. सम्राट प्रतिनिधी) व गजानन नरवाडे (समाज कल्याण अधिकारी) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर मुख्य वक्ते डॉ. भिमराव हाटकर यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सहायक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांनी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन पापंटवार (तालुका समन्वयक) यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजानन नरवाडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यानंतर सामाजिक समता सप्ताह-२०२६ अंतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने समाज कल्याण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अशोक नगर, नांदेड येथील नवबौद्ध वस्तीत स्वच्छता अभियान राबविले.



# कर्मचारी युनियनचे नवनिर्वाचित ॲड. बाबुराव पुजरवाड यांची नाशिक जिल्हा परिषदेला सदिच्छा भेट

■ नाशिक वृत्तसंस्था

कर्मचारी युनियनचे नवनिर्वाचित राज्याध्यक्ष ॲड. बाबुराव पुजरवाड यांनी आज नाशिक जिल्हा परिषदेला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी जिल्हा परिषदेतील विविध विभागातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडी अडचणी, मागण्या व सूचनांची सविस्तर माहिती घेतली.

यावेळी बोलताना ॲड. पुजरवाड यांनी सांगितले की, सर्व संवर्गीय कर्मचारी वर्गाच्या हितासाठी कर्मचारी युनियन नेहमीच कटिबद्ध असून त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रशासनाशी सकारात्मक पद्धतीने पाठपुरावा करत आलेली आहे क करत आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी समन्वय साधून ठोस पावले उचलण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कर्मचाऱ्यांनीही आपल्या प्रलंबित प्रश्नांबाबत माहिती देत, कामकाजातील अडचणी मांडल्या. या सर्व मुद्द्यांवर लवकरात लवकर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे ॲड. पुजरवाड यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे जुनी पेन्शन, वेतन त्रुटी, पदोन्नती स्तर कमी करणे, अनुकंपा नियुक्ती पूर्ववत करणे, परिचर वाहन चालक भरती पूर्ववत करणे यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे व तशी गरज पडल्यास २१ एप्रिल पासून राज्य कर्मचाऱ्यांच्या संपाबरोबरच जि प कर्मचारी देखील संपावर जाण्याच्या तयारीत संदर्भात बैठक आयोजित असून लवकरच योग्य तो निर्णय घेणार असलेबाबत कळविण्यात येईल असे आश्वाशित केले.

यावेळी नंदकुमार सोनवणे, अबूनाना शेख, हंसराज वटघुले, श्याम कांबळे, ललिता बागुल, मोराने मॅडम, विजया सोनवणे, कल्पना कापडणीस ह्यांनी कर्मचारी मागण्यासंदर्भात व अभिनंदन पर भाषण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभा.जिल्हा अध्यक्ष प्रशांत कवडे, सूत्रसंचालन प्रकाश थेटे व आभार संदीप दराडे यांनी केले. सदर बैठकीत ठाणे जिल्हा अध्यक्ष गजानन विसे, राज्य शाखेचे कोषाध्यक्ष विजयकुमार हळदे यांनी युनियन च्या कार्याबद्दल व पुढील प्रलंबित मागण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. प्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अजय कस्तुरे, रवी थेटे, संदीप दराडे, प्रकाश थेटे, नाशिक प्रभारी जिल्हा अध्यक्ष प्रशांत कवडे, कोषाध्यक्ष श्रीरंग दीक्षित, कार्याध्यक्ष अजित आव्हाड, विजय संधान, राजेश आहेर, विनय जाधव, पेन्शनर संघटनेचे दिलीप वारे, शालिग्राम उदावंत, ज्ञानेश्वर गायकवाड, कल्पना कापडणीस, श्याम पाटील, मनीष चव्हाण, विनय सोनवणे, मयूर चव्हाण, चित्रा चांगटे, मनीषा काळे, पूजा सोनवणे, जयश्री ठाकरे, नम्रता गायकवाड, अनिता बरू, विशाल कामडी, राहुल देवरे, भूषण भामरे, मनोज रोटे, दिलीप पाटील, राजेश रासने, ससाणे, स्वप्नील कानडे, प्रतीक तिवारी, दीपक भदाणे, रवी गायकवाड व इतर पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रहारचे प्रशांत मुके यांच्या यशस्वी पाठपुराव्यानंतर मनपा एन विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे यांच्याकडून रामनगर(अ) याठिकाणी लावण्यात आले पथदिवे

■ घाटकोपर,(केतन भोज)

रामनगर (अ) ट्रान्झिट कॅम्प येथील मुख्य रस्त्यावर पथ दिवे लावण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती.

डोंगराळ भागात राहणाऱ्या नागरिकांच्या येण्या-जाण्यासाठी रामनगर(अ) ट्रान्झिट कॅम्प हा मुख्य रस्ता असल्याकारणाने सदर रस्त्यावर रात्री उशिरापर्यंत नागरिकांची रहदारी चालू असते.स्थानिक नागरिकांना कामावर जाण्यासाठी तसेच घरी जाण्यासाठी हा मुख्य रस्ता असून लहान मुले,वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक,महिला तसेच वाहन चालक यांना रात्रीच्या वेळी या रस्त्यावर अंधार असल्यामुळे येण्या-जाण्यासाठी अत्यंत जिकिरीचे होत होते.याशिवाय या रस्त्यावर होणाऱ्या अंधारामुळे कोणतेही चुकीचे प्रकार याठिकाणी घडू नयेत.म्हणून याठिकाणी तत्काळ पथदिवे लावण्यात यावे अशी मागणी प्रहारचे प्रशांत मुके यांच्याकडून करण्यात आली होती.जेणेकरून या रस्त्यावरून रात्री येजा करणाऱ्या स्थानिक नागरिकांना सुरक्षितता वाटेल.




प्रशांत मुके यांच्या मागणी नंतर आणि यशस्वी पाठपुराव्यामुळे त्यांच्या या मागणीची मनपा एन विभाग प्रशासनाने दखल घेत तत्काळ मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे तसेच एन विभाग इलेक्ट्रिशन विभागाच्या गौरी चितळे यांच्याकडून रामनगर(अ)ट्रान्झिट कॅम्प याठिकाणी पथदिवे लावण्यात आले असून सर्व रस्ता आता प्रकाशमय झाला आहे.

तरी स्थानिक नागरिकांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके तसेच मनपा एन विभाग प्रशासन यांनी केलेल्या या कामामुळे स्थानिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# छत्तीसगड हादरलं! लग्नावरून परतताना भीषण अपघात; ६ ठार, ३ गंभीर जखमी

■ छत्तीसगड वृत्तसंस्था

छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी (९ एप्रिल) उशिरा रात्री नाथिया नवागावाजवळ दोन गाड्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

**नेमकं प्रकरण काय ?**

कोतवाली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात (Chhattisgarh Accident) झाला. मृत कुटुंब कांकेरमधील उडकुडा येथील रहिवासी होते. सांगितले जात आहे की, सर्वजण चीवरांज येथे लग्न समारंभाला उपस्थित राहून आपल्या गावाकडे उडकुडाला परतत होते. त्यावेळी नाथिया नवागावाजवळ त्यांच्या गाडीची दुसऱ्या गाडीशी धडक झाली. दोन्ही गाड्या वेगात होत्या आणि धडक इतकी भीषण होती की वाहनांचे तुकडे तुकडे झाले.

गाडीमधील एकाच कुटुंबातील ३ महिला, २ पुरुष आणि एका मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या गाडीमधील ३ जण गंभीर जखमी झाले आहेत.

**सर्वांची प्रकृती गंभीर :**

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी (Chhattisgarh Accident) पोहोचले आणि जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कांकेरचे पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. अपघातातील तिन्ही जखमींना तातडीने ॲम्ब्युलन्सच्या मदतीने जिल्हा रुग्णालय कांकेर येथे हलविण्यात आले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. सध्या पोलीस संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत असून अपघाताचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**पोलिसांकडून पुढील चौकशी सुरु :**

कांकेरचे पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनी सांगितले की, नाथिया नवागावाजवळ दोन गाड्यांच्या धडकेत (Chhattisgarh Accident) सहा जणांचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी आहेत. पोलीस या प्रकरणाची चौकशी करत असून मृतांची ओळख पटवणे आणि इतर माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे. जखमींवर उपचार झाल्यानंतर त्यांच्याकडूनही माहिती घेतली जाणार आहे. मृतदेहांचा पंचनामा करून पोस्टमॉर्टमसाठी मॉर्चुरीमध्ये ठेवण्यात आले असून, पोस्टमॉर्टमनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

# एसआयआरमध्ये देशभरात 6.08 कोटी मतदारांची नावे वगळली

नवी दिल्ली : विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेनंतर देशातील 9 राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांच्या संयुक्त मतदार यादीत मोठी घट नोंदवण्यात आली आहे. या प्रक्रियेनंतर सुमारे 6.08 कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली असून एकूण मतदारसंख्या 51 कोटींवरून 44.92 कोटींवर आली आहे. उत्तर प्रदेशने अंतिम मतदार यादी जाहीर केल्यानंतर एसआयआर प्रक्रियेचा दुसरा टप्पा पूर्ण झाला आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, राजस्थान, छत्तीसगड, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा तसेच पुदुचेरी, अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशांच्या अंतिम मतदार याद्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत. बिहारमध्ये ही प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाली होती.

देशातील एकूण 99 कोटी मतदारांपैकी सुमारे 60 कोटी मतदारांना या मोहिमेत समाविष्ट करण्यात आले आहे. उर्वरित 40 कोटी मतदारांचा समावेश पुढील टप्प्यात 17 राज्ये आणि पाच केंद्रशासित प्रदेशांमध्ये केला जाणार आहे. या प्रक्रियेला संबंधित राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर गती मिळण्याची शक्यता आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# सकाळ ग्रुपकडून डॉ. रवी फड व डॉ. स्वप्नीता फड यांचा गौरव

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या डॉ. रवी फड व डॉ. स्वप्नीता फड यांचा सकाळ आरोग्य सारथी 'गौरवगाथा' या कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून सकाळ ग्रुपच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. 'सकाळ आरोग्य सारथी' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यात आला असून, त्यामध्ये फड दाम्पत्याच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली.

आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच रुग्णांना गुणवत्तापूर्ण व परवडणारी वैद्यकीय सेवा देण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक यावेळी करण्यात आले. विशेषतः ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना योग्य उपचार मिळावेत यासाठी त्यांनी राबविलेल्या उपक्रमांमुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे. या कॉफी टेबल बुकमध्ये मराठवाड्यातील निवडक डॉक्टरांच्या यशोगाथा, त्यांच्या सेवाभावी कार्याचा आढावा व समाजासाठी दिलेले योगदान यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये डॉ. रवी फड व डॉ. स्वप्नीता फड यांच्या कार्याची माहिती प्रभावीपणे मांडण्यात आली असून, त्यांच्या सेवेला प्रेरणादायी स्वरूप देण्यात आले आहे. कार्यक्रमा दरम्यान राज्याच्या आरोग्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर व मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देऊन डॉक्टरांचा गौरव करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी आरोग्य क्षेत्रातील डॉक्टरांचे







योगदान अनमोल असल्याचे नमूद करत, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो, असे मत व्यक्त केले. या सन्मानामुळे फड दाम्पत्याच्या कार्याला अधिक बळ मिळणार असून, भविष्यातही ते अधिक जोमाने समाजसेवा करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या सन्माबदल दै. सकाळचे जिल्हा जाहिरात प्रतिनिधी राजाभाऊ पवार व नागापूर प्रतिनिधी ॲड अर्जुन सोळंके, प्रा प्रविण फुटके यांच्या वतीने त्यांचे येथे अभिनंदन करण्यात आले.

## विशेष

# पुरुषांचे एव्हरग्रीन शर्ट्स...

**स्त्री आणि** पुरुषांच्या पोशाखात कमालीचा फरक असला तरी शर्ट किंवा टी-शर्ट हे या दोहोतला समान दुवा आहे. कारण अठराव्या शतकापर्यंत फक्त पुरुषी असलेल्या शर्टने महिलांच्या पोशाखातही मानाचे स्थान मिळविले. पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे पारंपरिक भारतीय पोशाखातील कुडता आणि सदऱ्यानेही कालाय तस्मै नमः म्हणत सुटसुटीत शर्टला शरण जाणे पसंत केले. एके काळी फक्त शर्ट घालणे अशिष्ट समजले जाई, कारण शर्ट हे कोटाच्या आत घातले जाणारे अंतर्वस्त्र होते. पुढे शर्टने त्याच्यावरील कोट किंवा ब्लेझरचे आवरण झुगारून देत मोकळा श्वास घेण्यास सुरुवात केली तेव्हा शर्टचा खरा पूर्ण चेहरा जगापुढे आला. दरम्यान काळानुरूप अनेक रूपे धारण करून शर्टने फॅशनविश्वातील आपले अग्रस्थान कायम ठेवले आहे.. जगातील सर्वात जुना शर्ट हा तीन हजार वर्षांपूर्वी फ्लिंडर्स पेट्री यांनी इजिप्तमध्ये बनविला होता. सुरुवातीच्या काळात शर्ट हे पुरुषांसाठी एक प्रकारचे (अंतर्वस्त्र) अंडरगार्मेंट म्हणून वापरले जात होते, कारण शर्टवर कोट किंवा ब्लेझर असे. केवळ शर्ट घातलेली व्यक्ती अपूर्ण पोशाखात असल्याचे समजले जाई. अगदी अठराव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत हा समज दृढ होता. कालांतराने हा समज बदलून अठराव्या शतकात शर्ट पूर्ण पोशाखाच्या पात्रतेस उतरला. याच काळात शर्टने आपले पुरुषप्रधानत्व झुगारून दिले. युरोप आणि अमेरिकेत १८६० नंतर महिलाही मोठ्या प्रमाणात शर्ट घालू लागल्या.

**कापड** दोन प्रकारचे असते. एक नॅचरल फॅब्रिक आणि मॅन-मेड फॅब्रिक. नॅचरल फॅब्रिक म्हणजे कॉटन, सिल्क आणि मॅन-मेड फॅब्रिक म्हणजे पॉलिस्टर इ. शर्ट सचे मुख्यतः तीन प्रकार असतात. कॅज्युअल शर्ट, ऑफिस शर्ट आणि फॉर्मल म्हणजेच पार्टी शर्ट.



### कुर्ती शर्ट्स

सण-समारंभातघातल्या जाणाऱ्या कुर्तीसारखेच कुर्ती शर्ट सध्या सर्व वयोगटांत लोकप्रिय आहेत. त्यांनी लोकांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. कॉटन, टेरिकॉटन अशा विविध मटेरिअल्सपासून हे शर्टस तयार केले जातात. चायनीज आणि मँडरिन कॉलरमध्ये उपलब्ध असलेले हे शर्टस आपण जीन्स, ट्राऊझर्स आणि ३/४ सारख्या सगळ्या प्रकारच्या पँट्सवर परिधान करू शकतो.

### लेनिन शर्ट्स

सर्व क्षेत्रांतील लोकांमध्ये लेनिन शर्ट खूप प्रसिद्ध आहेत. मुंबईच्या वातावरणास अनुसरून बाराही महिने घातले जाणारे हे शर्ट अधिक करून पांढरा, निळा, हिरवा अशा अनेक एकरंगीय पद्धतीत उपलब्ध आहेत. इतर शर्ट चुरगळला की त्याची ऐट कमी होते. लिनिन शर्टचे वैशिष्ट्य हे की, ते चुरगळल्यावर अधिक उठावदार आणि आकर्षक दिसतात. जीन्स आणि फॉर्मल्सवर परिधान केले जाणारे हे शर्ट दररोजच्या वापराबरोबरच सण-समारंभांमध्येही घालता येतात.

### ड्रेस शर्ट्स

कार्यालयात किंवा कॉर्पोरेट विश्वात काम करणाऱ्यांमध्ये फुल स्लीव्ह असलेले ऑफिस शर्ट म्हणजेच ड्रेस शर्ट फार लोकप्रिय आहेत. ऑफिसच्या वापराप्रमाणे शर्टला लवकर सुरकुत्या पडू नयेत म्हणून त्यात कॉटनबरोबरच टेरिकॉटनही वापरले जाते. लाइट रंगाबरोबरच प्लेन, चेक्स आणि स्ट्राइप्स पॅटर्नमध्ये असलेले हे ड्रेस शर्ट्स कार्यालयातील वातावरणात उठावदार दिसतात. जीन्स आणि ट्राऊझरवर आपण ड्रेस शर्ट परिधान करू शकतो.

### पार्टी शर्ट्स

वाढदिवस, लग्न, ऑफिस पार्टी अशा विविध विशेष प्रसंगांसाठी आपल्या प्रत्येकाकडे दररोजच्या कपड्यांबरोबरच वैशिष्ट्यपूर्ण असे फॉर्मल म्हणजेच पार्टी ड्रेस असतात. पार्टी ड्रेस हे चमकदार आणि आकर्षक दिसण्यासाठी सिल्क, लेनिन, टेरिकॉटन, कॉटनपासून बनविले जातात. हे शर्ट्स स्मॉल कॉलर, बटन कॉलर, चायनीज कॉलर अशा विविध प्रकारच्या कॉलर्समध्येही उपलब्ध असतात. या शर्टाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील खूपसे प्रिंटेड शर्ट हे हवाई, फिजी, गोवा अशा काही ठिकाणच्या समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशातील प्रिंट्समुळेही प्रसिद्ध झाले आहेत.

### गोल्फ शर्ट्स

रोजच्या आणि ऑफिसच्या वापरासाठी असलेले पोलो शर्ट म्हणजेच गोल्फ शर्ट खूप प्रचलित आहेत. हाफ बाह्यांचे असलेले हे शर्ट कॉटनचे असतात. विविध रंगांमध्ये उपलब्ध असणाऱ्या या शर्टमध्ये चेक्स किंवा स्ट्रिप्ससारखे पॅटर्न्स खूप कमी बघायला मिळतात.

### कॅम्प शर्ट

कॅज्युअल म्हणजेच कॅम्प शर्ट हा महाविद्यालयीन तरुणाईचा सर्वात आवडता प्रकार. भारतीय हवामानाप्रमाणे अधिकाधिक कॅम्प शर्ट हे कॉटनपासून बनविले जातात. विविध रंगांप्रमाणेच चेक्स आणि प्रिंटेड पॅटर्नमध्ये सर्वात जास्त उपलब्ध असलेले हे शर्ट्स दिसायलाही खूप आकर्षक आणि ट्रेंडी दिसतात. कमी देखभाल (मेंटेनन्स) करावे लागणारे हे कॅज्युअल शर्ट, ३/४, जीन्स, ट्राऊझर अशा प्रकारच्या पॅन्ट्सवर परिधान करता येतात.

### नक्षीदार शर्ट्स

तारे, पक्षी, ठिपके अशा अनेक आकारांचे वैविध्यपूर्ण टेक्श्चर असलेल्या डिझायनर शर्ट्सने सध्या तरुणाईला खूप आकर्षित केले आहे. कॉटन, टेरिकॉटनपासून बनवलेले हे शर्ट्स आपण जीन्स, ट्राऊझर्स आणि ३/४सारख्या सगळ्या प्रकारच्या पॅन्टवर परिधान करू शकतो.



# रिप्ड लाइट डेनिम जीन्स

रोजच्या वापरातील पायाला घट्ट चिकटून बसणारी जीन्स उन्हाळ्यात नकोच असते. पण आपण १२ महिने ही जीन्स वापरतोच. त्यामुळे उन्हाळ्यातही कितीही त्रास झाला तरी बरेच लोक जीन्स घालतात. हेच हेरून डेड डेनिम किंवा रिप्ड (Ripped) लाइट डेनिम जीन्स बाजारात आल्या आहेत. लेग फ्रेंडली अशा या जीन्स तुम्हाला कडक उन्हाळ्यातही वापरता येतील. या जीन्स लुज फिटिंग असणाऱ्या, वॉशिंगसाठी सोप्या आणि महत्त्वाचं म्हणजे सहज घालता आणि काढता येणाऱ्या अशा आहेत. अशा जीन्सवरती तुम्ही प्रिंटेड टी-शर्ट, लुझ फिटिंग शर्ट, पेस्टल रंगाचे शर्ट, चेक्स शर्ट घालू शकता.





# मुलांमध्येही साईड बॅगची क्रेझ...

**बॅग्ज** डिझायनरांनी फक्त मुलींसाठीच अनेक व्हरायटीची निर्मिती केली नसून मुलांसाठीही सध्या बाजारात अनेक प्रकारच्या बॅग उपलब्ध करुन दिल्या आहेत. यात फॅशनेबल साईड बॅग खास मुलांसाठी नवीन डिझाईन्स आणि आकारामध्ये आले आहेत. यामुळे हा मुलांसाठी एक नवा फॅशन ट्रेंड बनलेला आहे. त्यात रकसॅक, कंबरेला बांधायचे साईड पाउच अशा प्रकारचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत. अशा प्रकारच्या बॅगचे वजन कमी असल्याने वापरणे सोयीस्कर ठरते. या बॅगमुळे हातही मोकळे राहतात. सोबतच फॅशनेबल लुकही दिसतो. यामुळे कॉलेजगोईंग तरुणांमध्ये याची क्रेझ सध्या बघायला मिळत आहे. फॅशनची ही क्रेझ फक्त शाळा-महाविद्यालयातच नव्हे, तर ट्रेकर्स, जिमला जाणाायांमध्येही अधिक पसंतीची ठरत आहे. यात ट्रेनची किंवा बसची तिकिटे, चोटा डिजीकॅम, टॉर्च, घराची किल्ली, रुमाल किंवा नॅपकीन, मोबाईल, थोडेसे पैसे, एखाद-दोन गोळ्या असे साहित्य सहज बसू शकते. एकंदरीत स्टायलिश लुक मिळण्यासाठी सर्वचजण आकर्षक व फॅशनेबल बॅग्जचा वापर करताना दिसत आहेत.

# भन्नाट आर्मीवाली प्रिंट

**कॅमो फ्लाज किंवा कॅमो प्रिंट हे सहसा आर्मी युनिफॉर्ममध्ये वापरलं जातं असा आपला समज आहे. आपण तसं प्रिंट आर्मीवाल्यांच्याच कपड्यांत पाहिलेलंही असतं; परंतु आता कॅमो प्रिंट ट्रेंडमध्ये आहे. कॉन्फीडंट, टफ लुक देण्यास कॅमो प्रिंट अतिशय योग्य आहे. कॅमो प्रिंट दिसायला साधे दिसले तरी ते कॅरी करणे तसे सोपे नाही आहे. लेदर शूज किंवा सॅण्डल्स, डार्क गॉगल आणि हे कॅमो प्रिंट हे सारं घालता तर कुणालाही येईल, पण ते शोभणे मात्र महत्त्वाचे असते.**

कपड्यांमध्ये ठोस असे नियम नसतात, कोणी ठामपणे म्हणू शकत नाही हे चांगलं आणि ते वाईट? प्रत्येकाची रंगांची आवड, व्यक्तिमत्त्व, बांधा इत्यादी गोष्टींवर कपड्याची पसंती ठरते. अलीकडेच हृतिक रोशनने एक आगळेवेगळे कॉम्बिनेशन वापरून मोठी तारीफ कमाई केली. कधीच न पाहिलेले फ्लोरल शर्ट आणि कॅमो जॅकेट आणि पॅण्ट हे कॉम्बिनेशन त्यानं केलं होतं. ते पेललंही खूप प्रभावीपणे. फ्लोरल आणि कॅमो याचा एकत्र वापर तसा खूप दुर्मीळ; पण त्यामुळेच हटके वाटला. सूर नवा ध्यास नवा फेम शाल्मलीसुद्धा गेल्या आठवड्यात कॅमो जम्पसूटमध्ये दिसली. तिचा स्लिव्हलेस फ्रंट झिप कॅमो जम्पसूट एकदम बोल्ड लूक देऊन गेला. तिचा सडपातळ बांधा, उंची, हेअरस्टाइल, सॅण्डल्स हे सगळंच कॅमो जम्पसूटला साजेसं होतं, त्यामुळेच तिचा एक भन्नाट लूक आपल्याला दिसला. कॅमो प्रिंट हे काळ्या-करड्या, हिरव्या,-पिवळसर, निळया रंगसंतीत पाहायला मिळतात. या प्रिंटमध्ये कार्गो पॅण्ट, शॉर्ट्स, केप्री, शर्ट, टी-शर्ट, जॅकेट, शूज हटके दिसतात. कॅज्युअल डे आउटिंग, ट्रेक, जंगल सफारी इत्यादीसाठी कॅमो प्रिंट साजेसं आहे. कॅमो प्रिंटेड कार्गो, कॅप्री, जॅकेट वापरत असाल तर प्लेन काळा टी-शर्ट, टॅन्क टॉप हे कॉम्बिनेशन सुटसुटीत ठरतं.



# फॉलो एव्हरग्रीन ट्रेंड्स

**फॅशनविश्वातील रहिवासी सतत नवनवीन ट्रेंड्स फॉलो करण्याच्या प्रयत्नात असतात. या विश्वात सदोदित चहलपहल बघायला मिळते. विविध सेलिब्रिटींकडून नवे ट्रेंड रुढ केले जातात आणि त्यांना फॉलो करण्यात धन्यता मानणारे रसिकजन इमानेइतबारे त्यांचे फॉलोअर्स बनतात. पण हे न करता तुम्ही काही एव्हरग्रीन फॅशन ट्रेंड्चा मागोवा घेऊ शकता. त्यासाठी तुमच्याकडे काय असायला हवे हे पाहुया..**



- कॅमो प्रिंट किंवा आर्मी प्रिंट हा सदाबहार ट्रेंड आहे. कॅमो प्रिंटवाली जॉगर तुम्ही खरेदी करू शकता.
- पिवळ्या काचेचे गॉगल्स हा सध्याचा ट्रेंड आहे. हे गॉगल्स कोणत्याही आउटफिटसोबत खुलून दिसतात तसंच कोणत्याही चेहऱ्यासाठी हा प्रकार उत्तम आहे.
  चेक्सची ट्राऊजर हा सुद्धा चांगला ऑप्शन आहे. या ट्राउझर्स फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही ऑकेजन्सना कॅरी करता येतील. व्ही नेक टी शर्टसोबतही तुम्ही ही ट्राऊजर पेअर करू शकता.
- प्रिंटेड सॉक्स हा ऑप्शन तुम्ही ट्राय करू शकता. हे सॉक्स तुमच्या लूकला चार चाँद लावतील.
- नवा ट्रेंड फॉलो करायला प्रत्येकालाच आवडते पण लेदर हे मटेरिअल कधीही आऊट ऑफ ट्रेंड होत नाही. त्यामुळे लेदरची बॅकपॅक सोबत ठेवा.
  तुम्हाला पिंट्रेड टी-शर्ट कॅरी करता येईल.
- डेनिम्स किंवा चिनोजसोबत हा टी-शर्ट कॅरी करा. नव्या पिंट्रस आणि हटके रंग तुम्ही कॅरी करू शकता.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार 12 एप्रिल 2026



# बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; सोमणवाडी शिवारातून गावठी पिस्तूलसह धाबा चालकास अटक



**बीड | प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध हत्यारांविरुद्ध पोलिसांनी कडक मोहीम उघडली असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने सोमणवाडी (ता. परळी) शिवारात छापा टाकून एका इसमाला गावठी पिस्तूलसह रंगेहात पकडले आहे. विलास अंकुश चाटे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

■ **नेमकी घटना काय? -**


सोमणवाडी शिवारातील एका धाब्याचा चालक विलास चाटे हा आपल्याकडे विनापरवाना पिस्तूल बाळगून असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर, पथकाने शुक्रवारी (१० एप्रिल) रात्री ९ वाजेच्या सुमारास संबंधित धाब्यावर अचानक छापा टाकला.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीकडून ४० हजार रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्तूल जप्त केले. याप्रकरणी पोलीस नाईक गोविंद भताने यांच्या फिर्यादीवरून बर्दापूर पोलीस ठाण्यात कलम ३/२५ आर्म अॅक्टनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास बर्दापूर पोलीस करत आहेत.

■ **यांनी केली कारवाई:**

ही धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार गोविंद भताने, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप, तसेच पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळे आणि विकास राठोड यांचा समावेश होता.



## मराठा सेवा संघातर्फे प्राजक्तताताई धस यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर

**आष्टी प्रतिनिधी :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर समता, समानता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांचा पुरस्कार करून समाजामध्ये काम करीत असलेल्या मराठा सेवा संघातर्फे राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजि. विजय घोगरे यांच्यातर्फे इंजि. तानाजी बापू जंजिरे यांनी आष्टी येथील पत्रकार परिषदेमध्ये हे पुरस्कार जाहीर केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शिवमती शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या राजकीय सामाजिक सांस्कृतिक व महिला सक्षमीकरण कार्यामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना समाजभूषण पुरस्कार देण्यात येत आहे तर महानंद डेअरीच्या संचालिका आष्टी येथील शिवमती प्राजक्तताताई सुरेश धस यांनी वेगवेगळ्या माध्यमातून स्त्री सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आणि



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन 87 वर्षे वयाचे आष्टीचे सुपुत्र सावळेराम कृष्णाजी जंजिरे काका ,यांनी मुंबई येथे राहून गावाकडील विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल व दीपस्तंभ होऊन मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आलाआहे.

हे तीनही पुरस्कार आज दिनांक 12 एप्रिल 2026 रोजी आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तीगृह लोकार्पण सोहळा कार्यक्रमाच्या वेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या उपस्थितीमध्ये देण्यात येणार आहेत . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजिनिअर विजय घोगरे हे राहणार आहेत.

यावेळी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, मराठवाडा भूषण आ.सुरेश धस, आ.सतीश भाऊ चव्हाण, इंजि.नवनाथ घाडगे, शिवश्री अर्जुनराव तनपुरे, शिवश्री मनोज दादा आखरे, शिवमती सीमाताई बोके,माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर,माजी आ. बाळासाहेब आजबे काका यांचेसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पंचक्रोशीतील प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर ,इंजिनिअर, वकील व समाजाच्या सर्व थरातील कार्यकर्त्यांनी या लोकांपर्यंत लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन इंजि. तानाजी जंजिरे, भास्करराव निंबाळकर, लक्ष्मण रेडेकर,प्रा. डॉ.बाबासाहेब मुटकुळे ,प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे, प्राचार्य शशिकांत कन्हेरे, सुरेश पवार सर, बन्सीधर मोरे , अॅड सीताराम पोकळे आदी मान्यवरांनी केले आहे.

## कडा प्रा.आ.केंद्रात २५ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संपन्न

**आष्टी ( प्रतिनिधी)**

कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये काल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली

कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरित्या पार पडले.या शिबिरामध्ये बीड येथील अनुभवी सर्जन डॉ.सुजित मसुरे आणि कडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे-विधाते यांनी मिळून तब्बल २५ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत.

ग्रामीण भागातील माता-भगिनींना दर्जेदार आणि सुरक्षित आरोग्य सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.डॉ.सुजित मसुरे यांचा प्रदीर्घ वैद्यकीय अनुभव आणि डॉ.शिवानी बोडखे-विधाते यांचे उत्कृष्ट कौशल्य व नियोजन यामुळे सर्व २५



शस्त्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडल्या.रुग्णांना तत्पर आणि उत्तम दर्जाची सेवा मिळाल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.हे कुटुंब कल्याण शिबिर यशस्वी करण्यासाठी कडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व परिचारिका, आरोग्य सेवक आणि इतर सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या सामूहिक आणि प्रयत्नांमुळेच हे शिबिर सुरळीत पार पडले. या यशस्वी शस्त्रक्रिया मोहिमेनंतर दोन्ही डॉक्टरांनी सर्व कर्मचारी वृंदासमवेत समाधान व्यक्त करत प्रा.आ. केंद्रामध्ये एक एकत्रित छायाचित्रही घेतले.

कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे व वैद्यकीय अधिकाऱ्यांसह संपूर्ण आरोग्य पथकाच्या उत्कृष्ट कामगिरीचे परिसरातील नागरिकांमधून मोठे कौतुक होत आहे.

## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांची द्वि शताब्दी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख व प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा प्रसाद देशमुख म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व समाछसुधारणेमध्ये फार मोठे योगदान असून ते कधीही न विसरणारे आहे. तर प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी सांगितले की, स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू केल्याने



आज महिलांना शिक्षण घेता येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रविण फुटके यांनी तर प्रास्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ विवेकानंद कवडे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ट्रांसफार्मर मधून जाळ निघाल्याने अडीच हेक्टर लिंबोणी बाग जळून खाक




**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील जामगाव येथील शेख अतिक शेख रियाज यांच्या शेतातील लिंबोणीच्या बागेमधील महावितरण कंपनीच्या ट्रान्सफॉर्मर मधून जाळ निघाल्याने परिसरातील गवताने पेट घेतला त्यामुळे अडीच हेक्टर क्षेत्रातील फळबाग जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. जामगाव येथील शेख अतिक शेख यांची सर्वे नंबर 237 मध्ये तीन हेक्टर जमीन असून त्यापैकी दोन हेक्टर 20 आरक्षणावर सन 20 21 पासून लिंबोणी लागवड करण्यात आली होती उत्पन्न मिळाले होते आज दिनांक 10 एप्रिल रोजी दुपारी महावितरण कंपनीच्या त्यांच्या शेता शेजारील ट्रान्सफर मधून जाळ बाहेर निघाला आणि परिसरातील त्यामध्ये दोन हेक्टर वीस आर या क्षेत्रातील सहाशे लिंबूनिचे झाडे संपूर्ण जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

गेल्या वर्षी या लिंबोणीच्या बागेतून सात ते आठ लाख रुपये उत्पन्न मिळाले होते महावितरणच्या दुर्लक्षामुळे माझे मोठे नुकसान झाले आहे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे.

## महात्मा फुले यांचे कार्य म्हणजे सामाजिक परिवर्तनाची क्रांती : प्रदीप मुंडे



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय येथे महान समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात नागापूर जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रीय कर्मचारी सेनेचे बीड विभाग अध्यक्ष श्री. प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रदीप मुंडे म्हणाले की, महात्मा फुले यांचे कार्य हे केवळ एका काळापुरते मर्यादित नसून ते आजही समाजाला दिशा देणारे आहे. शिक्षणाचा प्रसार, स्त्री-पुरुष समानता आणि शोषित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले योगदान हे प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे आचरण केल्यास समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडू शकते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.डी.मुंडे, प्रा. महादेव रायभोळे ,प्रा.सचिन डहाळे, प्रा. डॉ. दशरथ रोडे,प्रा. डॉ. सहदेव घरजाळे, नरहरी मुंडे, नागनाथ साबणे,ब्रह्मदेव कांबळे, जीवराज मुंडे, राजाभाऊ तांदळे, महादेव दौंड, अरुणाचल रोडे आदीसह कर्मचारी , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.